# दि कल्याण जनता सहकारी बँक लि. (शेडयुल्ड बँक)

## ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

रविवार दि. ०३.०८.२०१४ रोजी बँकेची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा महावीर हॉल, आग्रा रोड, कल्याण (प.) येथे दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आली होती.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी ठीक ३.३० वाजता जाहीर केले की, नव्याने पारित झालेल्या उपविधीनुसार गणसंख्या ३०० असल्याशिवाय सभा सुरु करता येत नाही. सध्या तेवढी गणसंख्या नसल्याने सभा ३० मिनिटे पुढे ढकलण्यात येत आहे. त्यानंतर ठीक ४.०० वाजता गणसंख्या ३३१ असल्याचे जाहीर केले. सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन सभेची सूचना वाचून दाखविली. तसेच अहवालातील मुद्रणदोषही सांगितले.

मा. अध्यक्ष श्री. मोहन आघारकर यांनी सर्व भाग धारकांचे स्वागत केले व ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मा. संचालक श्री. अनिरुध्द जाधव यांना सभेपुढे सादर करण्यास सुचविले.

रविवार दि. ११.०८.२०१३ रोजी झालेल्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मा. संचालक श्री. अनिरुध्द जाधव यांनी सभेसमोर सादर केले. सदर इतिवृत्त सभासदांना आधीच उपलब्ध करुन देण्यात आले होते. यानंतर मा. अध्यक्ष श्री. मोहन आघारकर यांनी सभेपुढे ठराव मंजुरीकरिता मांडला.

ठराव क्र. १ : रविवार ११.०८.२०१३ रोजी झालेल्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त **मा. संचालक श्री. अनिरुध्द जाधव** यांनी सभेपुढे मांडले. त्यास ही सभा कायम करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. दत्तात्रय सदाशिव कराळे | सभासद क्र. ६१२३ |
| अनुमोदक | : | श्री. वसंत पांडुरंग केणे | सभासद क्र. १२५३६ |
| | | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

सभासद श्री. नागप्पा सिधप्पा कुल्लूर (सभासद क्र. १६९२३) यांनी निर्लेखित कर्ज खात्यांची नावे व रक्कम सांगण्याबाबत आग्रह केला. यावर मा. अध्यक्षांनी सांगितले की, निर्लेखित केलेल्या कर्जखात्यांची रक्कम ठरावात नमूद असून सभेच्या सूचनेमध्ये ज्यांना कागदपत्रे पाहावयाची आहेत त्यांनी ती मुख्य कार्यालयात येऊन बघावी अशी सूचना अंतर्भूत होती. त्याप्रमाणे आपण कार्यवाही करणे आवश्यक होते. सदरचा विषय आजच्या सभेमध्ये घेणे संयुक्तिक ठरणार नाही. आपणांस यासंदर्भात कागदपत्रे पाहावयाची असल्यास आपण ती पुढील कालावधीत मुख्य कार्यालयात येऊन पाहावीत.

यानंतर बँकेचे उपाध्यक्ष मा. प्रा. विलास पेणकर यांनी अहवाल सालात देवाज्ञा झालेल्या मान्यवर व्यक्ती व सभासद यांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा ठराव मा. अध्यक्षांच्या वतीने सभेत मांडला.

ठराव क्र. २ : **दुखवटयाचा ठराव -**

अहवाल सालात ज्या मान्यवरांचे व सभासदांचे निधन झाले त्यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून ही सभा श्रध्दांजली वाहत आहे.

ग्रामविकास मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे, माजी केंद्रीय मंत्री आणि वनराईचे संस्थापक मोहन धारिया, भाजपचे माजी अध्यक्ष बंगारु लक्ष्मण, भारतरत्न नेल्सन मंडेला, माजी संस्थापक

संचालक शरदचंद्र ओक, ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी दत्ताजी ताम्हाणे, राष्ट्रसेवा दलाच्या पहिल्या महिला अध्यक्ष सुधाताई वर्दे, हिंदू महासभेचे नेते विक्रम सावरकर, ज्येष्ठ पत्रकार व लेखक अशोक जैन, ज्येष्ठ पत्रकार, लेखक व पद्मविभूषण खुशवंतसिंग, टिस्कोचे माजी अध्यक्ष रुसी मोदी, सुप्रसिध्द उद्योजक डॉ. नीळकंठ कल्याणी, अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर, कालनिर्णयकार जयंत साळगावकर, सुप्रसिध्द साहित्यिक शं. ना. नवरे, दलित पँथरचे संस्थापक व साहित्यिक नामदेव ढसाळ, संगीतकार आनंद मोडक, ज्येष्ठ नाटककार व समिक्षक गो. पु. देशपांडे, नाट्य निर्माते सुधीर भट, सिनेअभिनेते फारुख शेख, अभिनेते कुलदीप पवार, अभिनेत्री बेबी नंदा, अभिनेत्री सुचित्रा सेन, ज्येष्ठ अभिनेते व दिग्दर्शक विनय आपटे, चित्रपट दिग्दर्शक राजीव पाटील, ज्येष्ठ पार्श्वगायक मन्ना डे, गीतकार व कवी सुधीर मोघे, जयपुर, अत्रौली घराण्याच्या ज्येष्ठ गायिका धोंडुताई कुलकर्णी, चित्रकार प्रफुल्ला डहाणुकर, ज्येष्ठ सिनेमॅटोग्राफर व्ही. के. मूर्ती, छायाचित्रकार गोपाळ बोधे, माजी क्रिकेटपटू माधव मंत्री, सुप्रसिद्ध संवादिनीवादक पं. पुरुषोत्तम वालावलकर, ज्येष्ठ अभिनेत्री जोहरा सेहगल, अग्निशामन दलाचे जवान मोहन इवलेकर, गारपीट ग्रस्त शेतकरी व नुकतेच पुणे जिल्ह्यातील माळीण गावावर डोंगर कोसळून निधन झालेले गावकरी.

## दिवंगत सभासदांची यादी

| क्र. | सभासद क्र. | सभासदाचे नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १. | १०६८९ | ओतुरकर रमेश बळवंत | ०४.०४.२०१३ |
| २. | ३०४४ | भावे जयश्री प्रभाकर | ०७.०४.२०१३ |
| ३. | २६०५४ | पडवळ विजय नारायण | ११.०४.२०१३ |
| ४. | ९२३१ | जाधव विठ्ठल मोरेश्वर | ११.०४.२०१३ |
| ५. | १५५८७ | मोरे विकास शंकर | १६.०४.२०१३ |
| ६. | २२०५८ | राणे रविंद्र चंद्रकांत | १६.०४.२०१३ |
| ७. | ५८८५ | सुर्वे अरुण बळीराम | १८.०४.२०१३ |
| ८. | ३८२ | आपटे सुलभा महादेव | १८.०४.२०१३ |
| ९. | १०९१२ | बोबडे शिवराम रघुनाथजी | १९.०४.२०१३ |
| १०. | ११६९४ | घावरी सुखदेव दुंदा | १६.०५.२०१३ |
| ११. | २६३१७ | जगताप प्रदिप बाबुराव | १६.०५.२०१३ |
| १२. | ७२१३ | मेनन उन्नीकृष्णन के. पी. | २३.०५.२०१३ |
| १३. | २८६७ | सोनार बाळकृष्ण पांडुरंग | २७.०५.२०१३ |
| १४. | १७९७ | कुलकर्णी मनोहर विनायक | ३१.०५.२०१३ |
| १५. | १९५३५ | देशमुख सिताराम गणपत | ०४.०६.२०१३ |
| १६. | ३८७५९ | नागोटकर प्रकाश हिरामण | ०५.०६.२०१३ |
| १७. | १८५७२ | तगारे विजय नारायण | ०६.०६.२०१३ |
| १८. | ८८५२ | भालेराव मारुती जगन्नाथ | ०७.०६.२०१३ |
| १९. | ५३५८ | वाळके सुधा केरु | १६.०६.२०१३ |
| २०. | २६७८९ | गायकवाड शशिकांत दौलत | १७.०६.२०१३ |
| २१. | ४३०१९ | संकर ईसराक सोलोमन | ०४.०७.२०१३ |
| २२. | ३००९४ | गाडे आनंदा खंडू | ०५.०७.२०१३ |
| २३. | ६८१३ | तारे सुनिता अरविंद | ०६.०७.२०१३ |
| २४. | २३७ | फाटक लक्ष्मीबाई नारायण | १०.०७.२०१३ |
| २५. | ४२३३३ | देवरे धनसिंग भगवान | १३.०७.२०१३ |

| क्र. | सभासद क्र. | सभासदाचे नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| २६. | ४०४३४ | चौधरी आमराराम जसाजी | १४.०७.२०१३ |
| २७. | ४३५०७ | गायकवाड राजेंद्र भगवान | १९.०७.२०१३ |
| २८. | ४४६२३ | गायकवाड गोपाळ कान्हु | २५.०७.२०१३ |
| २९. | ३८१ | देशपांडे रघुनाथ वासुदेव | २७.०७.२०१३ |
| ३०. | २२४४१ | जगदाळे स्नेहलता विलास | २८.०७.२०१३ |
| ३१. | २६९०१ | बुचंडे शंकर जगन्नाथ | ३०.०७.२०१३ |
| ३२. | २०८८७ | राऊत सचिन मुरलीधर | ३१.०७.२०१३ |
| ३३. | १७१९५ | जोशी अशोक रामलाल | १४.०८.२०१३ |
| ३४. | १५९९९ | चौधरी अशोक रामचंद्र | २०.०८.२०१३ |
| ३५. | २०८४७ | शिरीसकर जनार्दन लक्ष्मण | २४.०८.२०१३ |
| ३६. | ४०८४२ | पालवे मनिषा बाबासाहेब | २६.०८.२०१३ |
| ३७. | २८६९३ | वारके लक्ष्मण शिवराम | ०५.०९.२०१३ |
| ३८. | ६९५० | ओझा रामलगन हरिहर | १६.०९.२०१३ |
| ३९. | ३९०९४ | टेकवानी शाम चुहरमल | २२.०९.२०१३ |
| ४०. | २१०५८ | साळुंखे सुरेश जनार्दन | २६.०९.२०१३ |
| ४१. | १०७५२ | पाटील लक्ष्मण काळू | २९.०९.२०१३ |
| ४२. | ४०५९० | मुळे नरेंद्र बापुराव | ०३.१०.२०१३ |
| ४३. | २८२७४ | राडे आनंद मल्हारी | ०६.१०.२०१३ |
| ४४. | २५४८९ | पाटील नरेश कृष्णा | ०७.१०.२०१३ |
| ४५. | ४८३९२ | पेडामकर किशोर सिताराम | ०८.१०.२०१३ |
| ४६. | २९०७२ | मण्यार रमेश रघुनाथ | १८.१०.२०१३ |
| ४७. | ४९०२४ | बावशी नरेंद्र नरोत्तमदास | २०.१०.२०१३ |
| ४८. | २४१०६ | चासकर रत्नाकर पुरुषोत्तम | २१.१०.२०१३ |
| ४९. | ९११३० | अकोलकर विनोद गणेश | ०२.११.२०१३ |
| ५०. | १५५२९ | पैठणकर मिनाक्षी दिनकर | ०२.११.२०१३ |
| ५१. | २३४ | फडके श्रीपाद विष्णु | ०९.११.२०१३ |
| ५२. | २४५० | कुलकर्णी मधुसूदन केशव | ११.११.२०१३ |
| ५३. | १६२४१ | जैन कांतीलाल कपुरचंद | १३.११.२०१३ |
| ५४. | ३४८२९ | म्हात्रे बाळाराम भिवा | १३.११.२०१३ |
| ५५. | १५०१५ | कागडा मुनेश रामपाल | १३.११.२०१३ |
| ५६. | ३५९०७ | शेख मलंग शब्बीर | १९.११.२०१३ |
| ५७. | १०३८७ | कुलकर्णी उमाकांत यशवंत | ०४.१२.२०१३ |
| ५८. | ३८६५२ | पवार सतिश नारायण | २०.१२.२०१३ |
| ५९. | १९७७२ | साठे रविंद्र महादेव | २४.१२.२०१३ |
| ६०. | २८०९ | जोशी शैलजा सुहास | ०८.०१.२०१४ |
| ६१. | १०५५४ | वारुळे दगडु लटकन | २३.०१.२०१४ |
| ६२. | ३९४११ | देव सुनंदा सुभाषचंद्र | १७.०२.२०१४ |
| ६३. | २०५७८ | कापसे लक्ष्मण काळु | २८.०२.२०१४ |
| ६४. | ५०१०८ | बिर्ला रतन सुभाषचंद्र | २३.०३.२०१४ |

| क्र. | सभासद क्र. | सभासदाचे नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ६५. | २१०७ | परांजपे मधुसूदन दत्तात्रय | २६.०३.२०१४ |
| ६६. | ४३३४१ | दुरगुडे शंकर सखाराम | ०८.०४.२०१४ |
| ६७. | १४९२६ | पाटील सुरेश रामजी | ११.०५.२०१४ |
| ६८. | २३०७१ | होले अरुण नारायण | १३.०५.२०१४ |
| ६९. | ४२६५८ | लाल प्रेम राधाकृष्णन | ०३.०६.२०१४ |
| ७०. | ३५० | केळकर माधव मोरेश्वर | ०६.०७.२०१४ |

या सर्वांना तसेच गारपीट ग्रस्त आणि माळीण दुर्घटनाग्रस्त गावकऱ्यांना श्रध्दांजली अर्पण करुन ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, अशी प्रार्थना करण्यात आली.

यानंतर मा. अध्यक्ष श्री. मोहन आघारकर यांचे अध्यक्षीय भाषण झाले. सर्व उपस्थित सभासदांचे पुन्हा एकदा स्वागत करुन त्यांनी आपले मनोगत दृक्‌श्राव्य माध्यमातून व्यक्त केले ते पुढीलप्रमाणे :

बँकेचे भागभांडवल सन २०१२-१३ च्या तुलनेमध्ये यावर्षी ८.१५% दराने वाढून ₹ ५१.४१ कोटीवरुन ₹ ५५.६० कोटी झाले आहे. राखीव व इतर निधी २९.६६% दराने वाढून ₹ ९४.७९ कोटी वरुन ₹ १२२.९० कोटी, ठेवी २१.४७% दराने वाढून ₹ १३०९ कोटीवरून ₹ १५९० कोटी, कर्जे २०.३०% दराने वाढून ₹ ९३१ कोटीवरुन ₹ ११२० कोटी झालेली आहेत. बँकिंग क्षेत्रात सरासरी वाढ १५% असताना आपली वाढ २०% पेक्षा जास्त आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार भांडवल पर्याप्तता प्रमाण ९% पेक्षा अधिक असले पाहिजे. आपले भांडवल पर्याप्तता प्रमाण १३.०१% आहे. आपल्या बँकेचा निव्वळ नफाही २०.२३% ने वाढून ₹ १८.१३ कोटी झाला आहे. कर्मचारी उत्पादकता चांगल्या प्रकारे २४.२५% दराने वाढून ₹ ६.७१ कोटी प्रति कर्मचारी झाली आहे. बँकेची सकल अनुत्पादित कर्जे ३.७४% वरुन २.७२% अशी कमी झाली आहेत. ही बँकेच्या दृष्टीने चांगली बाब आहे. आपली निव्वळ अनुत्पादित कर्जे गेली ७ वर्षे ०% आहेत. तशीच यावर्षी देखील ०% आहेत.

आर्थिकदृष्टया सक्षम व सुव्यवस्थापन यासाठी रिझर्व्ह बँकेचे मापदंड म्हणजे भांडवल पर्याप्तता प्रमाण, Gross NPA, Net NPA व कर्जाचे ठेवींशी असलेले प्रमाण बँकेने पूर्ण केले आहेत. CRR व SLR हे देखील रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे पाळलेले आहे. बँकेच्या स्थापनेपासून दरवर्षी वृध्दिंगत नफा मिळविलेला आहे. बँकेच्या मागील ५ वर्षाच्या प्रगतीचा विचार करावयाचा झाला तर मागील पाच वर्षात ठेवी व कर्जात दुप्पट वाढ झालेली आहे. एकत्रित व्यवसाय गेल्या ५ वर्षात ₹ १२५३ कोटीवरुन ₹ २७१० कोटीवर पोहोचला आहे. भाग भांडवलात तिप्पट वाढ झालेली आहे. आपल्या बँकेचे राखीव व इतर निधी गेल्या ५ वर्षात ₹ ८२ कोटीवरुन ₹ १२३ कोटी झाले आहे. आपली नेटवर्थ ₹ ७० कोटीवरुन ₹ १५६ कोटी झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार ज्या बँकेचे Net Worth ₹ १०० कोटीच्या वर आहे, त्या बँकांना Internet Banking सेवा उपलब्ध करण्याकरीता रिझर्व्ह बँकेकडून परवानगी मिळू शकते. आपल्या बँकेने Net Banking च्या परवानगीकरीता अर्ज केलेला आहे. आपली ढोबळ अनुत्पादित कर्जे गेल्या ५ वर्षात ५.४९% वरुन २.७२% इतकी कमी झाली आहेत. त्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न केले आहेत. तसेच मागील ५ वर्षात निव्वळ नफा ₹ ४.३८ कोटीवरुन ₹ १८.१३ कोटी झाला आहे.

मार्च २०१४ मध्ये RBI ने Banking Regulation Act अंतर्गत एक नवीन योजना अंमलात आणली आहे. या योजनेअंतर्गत RBI ने Deposit Education & Awareness Fund (DEAF) प्रस्थापित केला असून देशातील सर्व बँकांना त्यांच्याकडे असलेल्या १० वर्षांपेक्षा अधिक काळ व्यवहार नसलेल्या ठेवीदारांच्या खात्यातील सर्व रक्कम व १० वर्षांपेक्षा अधिक काळ मुदत संपलेल्या ठेवी या (DEAF) फंडामध्ये जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहे. RBI ने

अशा प्रकारचे परिपत्रक पाठवून जी खाती १० वर्षांपेक्षा जास्त काळ Inoperative आहे त्यातील सर्व रक्कम RBI कडे जमा करण्याचा आदेश सर्व बँकांना काढलेला आहे. असे कोणाचे खाते असेल तर त्यांना ह्या याबाबतची माहिती द्यावी. जेणेकरुन अशा खातेदारांच्या ठेव रकमा वरील फंडात जमा होण्यासाठी RBI कडे वर्ग होणार नाहीत.

२००८ पूर्वी ज्यांनी खाते उघडले आहे आणि आपले KYC Compliance पूर्ण केले नाही त्या सर्व खातेदारांनी आपले KYC Compliance पूर्ण करावे. मा. अर्थमंत्री अरुण जेटली यांनी २०१४-१५ चा अर्थसंकल्प संसदेत मांडताना सर्वसामान्य मध्यमवर्गीयांना आयकर कलम ८०C अंतर्गत देण्यात आलेली वजावट ही ₹ १.०० लाखावरुन ₹ १.५० लाखावर प्रस्तावित केली आहे. त्याचा फायदा आपण बँकेमार्फत घेऊ शकता. बँकेकडे आयकर कलम ८०C अंतर्गत उपलब्ध असणाऱ्या कल्याण कर बचत योजनेअंतर्गत आता आयकराच्या नवीन मर्यादेप्रमाणे एकूण ₹ १,५०,०००/- पर्यंत गुंतवणूक करुन त्यावर मासिक व त्रैमासिक व्याजाचा फायदा घेऊ शकता. RBI ने आपल्याला बँकिंग व्यवसायाबरोबर विमा व्यवसाय करण्याची परवानगी दिली असून त्या अंतर्गत विमा पॉलिसी घेऊन कलम ८०C अंतर्गत वजावट प्राप्त करु शकता.

बँकेने एकूण ७० स्वयंसहाय्यता बचत गटांना (Self Help Group) कर्ज दिले आहे. अतिशय छोट्या छोट्या व्यवसाय करणाऱ्या महिला या लाभार्थी गटात आहेत. लाभार्थी महिलांची संख्या १००० पेक्षा आधिक आहे.

बँकेच्या २८ शाखांमध्ये NRE खाते उघडण्याची सुविधा आपण आपल्या ग्राहकांना / सभासदांना / खातेदारांना उपलब्ध केली असून त्याचा सर्वांनी उपयोग करुन घ्यावा.

आपली बँक Techno-savy असून RTGS / NEFT, ECS, CTS व RuPay Debit Card ची सुविधा देखील बँकेने उपलब्ध करुन दिली आहे. त्याचाही लाभ घ्यावा.

मे. कोटक महिंद्रा ओल्ड म्युच्युअल लाईफ इन्शुरन्स कंपनीबरोबर जीवन विमा कंपनीचे कॉर्पोरेट एजंट म्हणून बँक कार्यरत आहे. तसेच मे. इफ्को टोकीओ जनरल इन्शुरन्स कंपनी यांचेबरोबर असलेल्या कराराची मुदत दि. १४.०३.२०१४ रोजी संपली असल्याने आपण सर्वसाधारण विमा व्यवसायासाठी आता मे. न्यू इंडिया अश्युरन्स कं. लि. यांचेबरोबर करार केला आहे. त्यामुळे ग्राहकांना विविध विमा योजनांचा पर्याय उपलब्ध आहे.

गेल्या वर्षी काही विशेष उल्लेखनीय कार्यक्रम झाले. बँकेच्या ४० वा वर्धापन दिन व संचालक समाजसेवा पुरस्कार वितरण समारंभास गोव्याचे मुख्यमंत्री मा. ना. मनोहर पर्रिकर प्रमुख पाहुणे होते. त्यांच्या हस्ते दि. २१.१२.२०१३ रोजी बालक मंदिर संस्था, नमस्कार मंडळ व भारतीय गोवंश रक्षण संवर्धन परिषद आनगाव गोशाला या संस्थांना संचालक समाजसेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दि. १५.०२.२०१४ रोजी RuPay Debit Cum ATM Card सुविधेचे उद्घाटन करण्यात आले. सदर कार्यक्रमास NPCI चे कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. ए. पी. होटा उपस्थित होते. सदरचे कार्ड स्वदेशी असून आपण त्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

बँकिंग व्यवसाय करत असताना सामाजिक ऋणांची अंशतः परतफेड व्हावी या उद्देशाने बँक आपल्या नफ्यातून १% रक्कम धर्मादाय निधीसाठी काढून ठेवत असते. दि. २९.०३.२०१४ रोजी एकूण १०१ सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय संस्थांना ₹ १३,१०,०००/- निधीचे वाटप करण्यात आले.

दि. १३.०५.२०१४ रोजी विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष श्री. प्रविण तोगडिया यांनी बँकेस सदिच्छा भेट दिली.

दि. १५.०६.२०१४ रोजी बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या नवीन वास्तू "कल्याणमस्तु" चे उद्‌घाटन झाले. सदर कार्यक्रमास मा. श्री. विनोदजी तावडे, विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधान परिषद, मा. श्री. सुनीलभाई मेहता क्षेत्र, कार्यवाह पश्चिम क्षेत्र रा. स्व. संघ व खासदार श्री. कपिल पाटील उपस्थित होते.

दि. २९.०७.२०१४ रोजी सभासद कल्याण निधी अंतर्गत सभासदांच्या पाल्यांसाठी विद्यार्थी प्राविण्य पुरस्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या बदलापूरच्या आदर्श कॉलेजच्या प्राचार्या (डॉ.) सौ. वैदेही दप्तरदार उपस्थित होत्या.

बँक गेली ४० वर्षे कार्यरत आहे. सन २०१७-१८ पर्यंत ₹ ५००० कोटींचा एकत्रित व्यवसाय, एकूण ५० शाखा व ₹ ५० कोटी नफा अशी दूरगामी उद्दिष्टे साकार करण्यासाठी धोरण रहाणार आहे.

सभासद डॉ. एल. पी. गांधी (सभासद क्र. ३५०५१) यांनी सूचविले की बँकेच्या प्रगतीच्या मापदंडाचा आलेख दाखविण्यात येतो, त्यात सध्याची बँकेची स्थिती आणि पुढच्या वर्षी काय स्थिती असेल यांच्या आकडेवारीचा सुद्धा उल्लेख असावा. Active Member च्या तरतुदीमुळे आपले भागभांडवल साधारण ₹ ५६ कोटीवरुन ₹ ७५ कोटी पर्यंत जाईल. त्यामुळे ते वाढविण्यासाठी काही तरतूद केली आहे का ?

यावर मा. अध्यक्षांनी सांगितले की आपल्या बँकेचे अधिकृत भागभांडवल हे ₹ १०० कोटी असून ते सध्या पुरेसे आहे. आवश्यकतेनुसार भागभांडवल वाढविण्याचा ठराव घेऊ.

ठराव क्र. ३ : सन २०१३-२०१४ सालातील बँकेच्या कामकाजाबाबत संचालक मंडळाच्या वतीने **मा. अध्यक्ष श्री. मोहन श्रीराम आघारकर** यांनी सादर केलेला वार्षिक अहवाल ही सभा स्वीकृत करीत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. शंकर रामचंद्र वर्तक | सभासद क्र. | १६०६६ |
| अनुमोदक | : | श्री. गणपत रामचंद्र अगिवले | सभासद क्र. | ४८०६० |

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर पुढील विषय क्र. ४, ५ व ६ एकमेकांशी निगडीत असून ते मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी **मा. संचालक श्री. श्रीनिवास फणसे** यांना सांगितले.

मा. संचालक श्री. श्रीनिवास फणसे यांनी सदर विषय सभेपुढे मांडले. त्यांनी सांगितले की यावर्षीचे आपले अंतर्गत लेखापरीक्षण मे. कीर्तने पंडीत यांनी केले असून वैधानिक लेखापरीक्षण मे. वैशंपायन ॲण्ड पाध्ये यांनी केले आहे. सन २०१३ - २०१४ चा ताळेबंद, नफा -तोटा पत्रक, लेखापरीक्षकांचा अहवाल व त्यासंबंधी इतर कागदपत्रे पाहण्यासाठी व माहिती घेण्यासाठी दि. २२.०७.२०१४ ते दि. २६.०७.२०१४ हा कालावधी ठेवला होता. त्यास अनुसरुन सभासद श्री. नागप्पा सिधप्पा कुल्लूर, श्री. दिलीप जाधव, श्री. भास्कर काशीनाथ भावसार, श्री. शेखर सीताराम बर्वे, श्री. गोपाळकृष्ण भिडे, श्री. राजेंद्र रमाकांत रहाळकर, श्री. विश्वास वि. जोशी यांनी पत्रे पाठविली होती. त्यांना प्रत्यक्ष बोलावून त्यांच्या शंकांचे निरसन केले असून त्यांनी केलेल्या सूचनांबाबत माहिती सभेस दिली. नफा तोटा पत्रक व ताळेबंद सर्वांना उपलब्ध केले असल्याचे सांगितले. त्यांनतर अंतर्गत व वैधनिक लेखापरीक्षकांच्या अहवालाचा गोषवारा त्यांनी सांगितला.

सभासद श्री. नागप्पा सिधप्पा कुल्लूर यांनी विचारले की एकूण ७ जणांना बँकेत बोलावून प्रत्येकाच्या शंकांचे वेगळे निरसन करण्यात आले. मिटींगमध्ये बोलावून त्यांच्या शंकाचे एकत्रित निरसन का करण्यात आले नाही त्याबाबत काय नियम आहेत / काय आधार आहेत ?

यावर अध्यक्षांनी सांगितले की प्रत्येकाचे विषय वेगवेगळे होते त्यामुळे वैयक्तिकरित्या शंकांचे निरसन बँकेने केले. त्यानंतर श्री. कुल्लूर यांनी वार्षिक अहवाल, सभा चालू होण्यापूर्वी देण्यात येतो, असा प्रश्न उपस्थित केला. यावर मा. अध्यक्ष यांनी आम्ही सदरचे अहवाल १५ दिवस अगोदर प्रत्येक शाखेत व मुख्य कार्यालयात उपलब्ध करतो असे सांगितले. त्यास अनेक सभासदांनी दुजोरा दिला व अहवाल सर्व शाखांमध्ये व मुख्य कार्यालयात उपलब्ध करुन देण्याबाबत यापूर्वी झालेल्या ठरावाची आठवण करुन दिली.

काही सभासदांनी अहवाल घरी पाठवावा असे सांगितले. यावर अध्यक्षांनी स्पष्ट केले की पूर्वी आपण अहवाल घरी पाठवीत होतो. परंतु प्रचंड प्रमाणात सदर अहवाल सभासदांपर्यंत न पोहचता बँकेत ते परत येत होते. यामुळे अवास्तव खर्च होऊ नये यादृष्टीने अहवाल बँकेतून घेऊन जाण्याची सोय केली असल्याचे सांगितले. तसा ठराव देखील पूर्वी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पारित केला गेला आहे. सध्या आहे तीच पध्दत पुढे चालू ठेवावी, असे बहुसंख्य सभासदांनी सांगितले.

ठराव क्र. ४ : संचालक मंडळाने सादर केलेले व वैधानिक लेखा परीक्षक मे. वैशंपायन ॲण्ड पाध्ये यांनी तपासलेले दि. ३१ मार्च २०१४ अखेरचे ताळेबंद, नफातोटा पत्रक **मा. संचालक श्री. श्रीनिवास फणसे** यांनी वाचून दाखविले व समजावून सांगितले. त्यास ही सभा स्वीकृत करीत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. चंद्रकांत सुकदेव बिरारी | सभासद क्र. | ३९८७३ |
| अनुमोदक | : | श्री. सुरेंद्र पंढरीनाथ झोपे | सभासद क्र. | २२३८८ |
| | | ठराव सर्वानुमते मंजूर. | | |

ठराव क्र. ५ : सन २०१३-२०१४ सालचा वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल **मा. संचालक श्री. श्रीनिवास फणसे** यांनी सभेपुढे मांडला. त्याची ही सभा नोंद घेऊन स्वीकृत करीत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. सयाजी मुकुंद खिलारी | सभासद क्र. | २०७१३ |
| अनुमोदक | : | श्री. भगवान वाघु लोंढे | सभासद क्र. | १४१०३ |
| | | ठराव सर्वानुमते मंजूर. | | |

ठराव क्र. ६ : सन २०१२-२०१३ सालचा वैधानिक लेखापरीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल **मा. संचालक श्री. श्रीनिवास फणसे** यांनी सभेपुढे मांडला. त्यास ही सभा स्वीकृत करीत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. निळकंठ रघुनाथ काळे | सभासद क्र. | २४९६ |
| अनुमोदक | : | श्री. दामोदर हरी पाटील | सभासद क्र. | ४१९५ |
| | | ठराव सर्वानुमते मंजूर. | | |

त्यानंतर पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. उपाध्यक्ष प्रा. विलास पेणकर यांना सूचविले.

ठराव क्र. ७ : सन २०१३-२०१४ या वर्षात निव्वळ नफा **₹** १८,१३,४५,६००.५१ इतका झाला आहे. संचालक मंडळाने नफा वाटणीस पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे. ती **मा. उपाध्यक्ष प्रा. विलास पेणकर** यांनी

सभेसमोर मांडली. सदर नफा वाटणीस ही सभा मंजूरी देत आहे.

| | |
|---|---|
| निव्वळ नफा | १८,१३,४५,६००.५१ |
| + लाभांश मधील जादा तरतूद | ७,९०,८१४.०० |
| मागील शिल्लक | ६२,९२४.९८ |
| **एकूण** | **१८,२१,९९,३३९.४९** |
| राखीव निधी | ४,६०,००,०००.०० |
| इमारत निधी | १,९५,००,०००.०० |
| लाभांश १५% | ८,००,००,०००.०० |
| सर्वसाधारण मुक्त निधी | १,८१,४०,०००.०० |
| गुंतवणूक वध घट निधी | १,५०,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | १५,००,०००.०० |
| निवडणुक निधी | १,००,०००.०० |
| शैक्षणिक निधी | १९,१०,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | ४९,३३९.४९ |
| **एकूण** | **१८,२१,९९,३३९.४९** |

नवीन मंजूर झालेल्या उपविधीतील तरतुदीनुसार, यावर्षी धर्मादाय निधी हा नफा वाटणीमध्ये घेण्यात आलेला नाही. त्याऐवजी तो नफा - तोटा खाती नावे टाकायचा आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या धर्मादाय निधीबाबतच्या नियमानुसार सन २०१३-१४ च्या निव्वळ नफ्याच्या ठरलेल्या प्रमाणातील रक्कम, सन २०१४-१५ च्या नफा तोटा खाती नावे टाकून खर्च करण्याचे अधिकार, ही सभा संचालक मंडळास देत आहे.

सूचक : श्री. हिलालसिंग जानराव पाटील सभासद क्र. १८९९८
अनुमोदक : श्री. अनिल जयराम पांचाळ सभासद क्र. १४५४
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभासद श्री. श्रीनिवास वायुवेगळा यांनी सूचविले की सभासदाकडे एकापेक्षा जास्त शेअर्स सर्टिफिकेटस असल्यास त्याचा लाभांश वेगवेगळ्या एंट्रिजद्वारे न देता एकत्रित देण्यात यावा.

यावर अध्यक्षांनी संचालक मंडळ आपल्या सूचनेवर जरुर विचार करेल असे सांगून पुढील वर्षाचे अंदाजपत्रक मांडण्यासाठी मा. संचालिका प्रा. सौ. सुषमा फडके यांना सांगितले.

मा. संचालिका प्रा. सौ. सुषमा फडके यांनी सन २०१४ - १५ चे अंदाजपत्रक मांडले. वार्षिक अहवालात अंदाजपत्रक व त्याचे विवेचनही दिले असून पुढील वर्षी ठेवी **₹** १८७५.०० कोटी व कर्जे **₹** १३००.०० कोटी असे उद्दिष्ट ठेवले असल्याची माहिती दिली. त्यानंतर सर्व सभासदांना मंगलमूर्ती ठेव योजनेची माहिती दिली.

ठराव क्र. ८ : सन २०१४ - २०१५ सालचे अंदाजपत्रक **मा. संचालिका प्रा. सौ. सुषमा फडके** यांनी सभेपुढे मांडले व समजावून सांगितले. त्याची ही सर्वसाधारण सभा नोंद घेत आहे.

सूचक : सौ. रेखा अरुण कुलकर्णी सभासद क्र. ४५१०६
अनुमोदक : श्री. वासूदेव पुनाजी डोंबारकर सभासद क्र. ११९२२
ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर बँकेचे दूरगामी धोरण व वार्षिक ध्येय धोरण, हा विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक ॲड. निशिकांत बुधकर यांना सांगितले.

मा. संचालक ॲड. निशिकांत बुधकर यांनी सांगितले की, ९७ व्या घटना दुरुस्तीमध्ये सभासदांचा सहभाग संस्थेच्या कार्यात वाढावा म्हणून अनेक विषय नव्याने मांडण्यात आले. १२ जानेवारी २०१२ रोजी मा. राष्ट्रपतींची या विधेयकावर सही झाली आणि १३ फेब्रुवारी २०१३ च्या राजपत्रात ते प्रसिध्द झाले. शासनाने अंमलबजावणीची तारीख १५ फेब्रुवारी २०१३ घोषित केली होती.

सहकार हा विषय राज्यांच्या अखत्यारितला होता. Directive Principles प्रमाणे त्यांना काही दिशानिर्देशही देण्यात आले होते. परंतु ९७ व्या घटना दुरुस्तीमध्ये सहकार हा विषय राज्यांच्या अख्त्यारितून काढून घेऊन केंद्र सरकारकडे गेला व तो आपल्या मुलभूत हक्कांमध्ये सामील करण्यात आला असल्याचे सांगितले.

सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये आपण प्रत्येकी ४ शाखांची परवानगी मागितली आहे. आपल्या बँकेचे रिझर्व्ह बँक इन्स्पेक्शन झाले नसल्याने भारतीय रिझर्व्ह बँकेने आपली मागणी प्रलंबित ठेवली होती. परंतु ते आता नुकतेच पूर्ण झाल्या कारणाने आता अपेक्षा आहे की आपल्याला यंदा ८ शाखांची परवानगी RBI कडून मिळेल.

इतर बँकाप्रमाणे मोबाईल बँकिंग आणि इंटरनेट बँकिंग सेवा ग्राहकांना प्रदान करण्याचा आपला प्रयत्न चालू आहे. कर्मचारी वेतन करार २०१३ मध्ये संपुष्टात आला. त्याचे नूतनीकरणाची शक्यता असल्याचे सांगितले. तसेच कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीची प्रक्रिया करण्यात येणार असल्याचे सांगितले.

आपण लवकरच Multistate सहकारी बँकेचा दर्जा मिळवण्याचा प्रयत्न करणार आहोत असे सांगितले. तसेच सभासदांच्या प्रशिक्षणाचे कार्यक्रम हाती घेणार आहोत असे सांगितले. सहकार खाते आणि RBI यांच्या प्रत्येक नियमांचे आपल्या बँकेकडून तंतोतंत पालन करण्यात आले आहे आणि त्याचप्रमाणे आपले दूरगामी धोरण असेल असे सांगून पुढील ठराव सभा पटलावर मंजुरीकरीता ठेवण्यात आला.

ठराव क्र. ९ : बँकेचे दूरगामी धोरण व वार्षिक ध्येयधोरण **मा. संचालक ॲड. निशिकांत बुधकर** यांनी सभेपुढे मांडले व समजावून सांगितले. त्यास ही सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. संतोष विलास शेटे | सभासद क्र. | १८४८७ |
| अनुमोदक | : | श्री. अनंत विठ्ठल ठाकरे | सभासद क्र. | ९५८९ |

ठराव सर्वानुमते मंजूर.

त्यानंतर अध्यक्षांनी पुढील ठराव मांडण्यासाठी मा. संचालक ॲड. सुरेश पटवर्धन यांना सांगितले.

मा. संचालक ॲड. सुरेश पटवर्धन यांनी सांगितले की आपण दैनंदिन कामकाज करीत असताना काही वेळेस काही उपविधींमध्ये दुरुस्ती करणे हे आवश्यक असते किंवा काही उपविधी हे नव्याने समाविष्ट करण्याची आवश्यकता असते.

मा. अध्यक्षांनी सांगितल्याप्रमाणे आपल्या अहवालातील पान नं. ४६ वर आपण कोणत्या उपविधीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे व कोणते उपविधी नव्याने समाविष्ट करणे आवश्यक आहे याची माहिती दिलेली आहे असे सांगितले.

त्याप्रमाणे उपविधी क्र. २(i) आपले मुख्य कार्यालय आता आपण आधारवाडीच्या वास्तूत स्थलांतरित केल्याने नोंदणीकृत कार्यालय देखील त्याच ठिकाणी स्थलांतरीत करावयाचे असल्याने आपण या उपविधीमध्ये दुरुस्ती करत आहोत असे सांगितले.

त्यानंतर उपविधी क्र.३४(डी) चा आशय पुढीलप्रमाणे सांगितला.

बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा किंवा विशेष सर्वसाधारण सभा या सभेची सूचना, ताळेबंद, नफा तोटा पत्रक, लेखापरीक्षकांचा दाखला, त्याचप्रमाणे संचालक मंडळाची निवडणूक असेल तर त्यासंदर्भातील सूचना बँकेच्या मुख्य कार्यालयात व सर्व शाखांमध्ये लावून सभासदांना माहिती करुन देण्यात येईल असा हा उपविधी असल्याचे सांगितले.

त्याचप्रमाणे पुढील उपविधी क्र.५८(c), ५८(d), ५८(g) हे तीन नवीन उपविधी समाविष्ट करीत आहोत. त्याचा आशय पुढीलप्रमाणे सांगितला. आपली वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्यानंतर आपला लाभांश सभासदांच्या बँक खात्यात अथवा बँकेत खाते नसल्यास मुख्य कार्यालयातून पे - ऑर्डरच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगून ठराव मंजूरीकरीता सभेपुढे मांडण्यात आला.

ठराव क्र. १० : बँकेच्या उपविधी क्र. २(i), ३४(d), ५८(c), ५८(d), ५८(g) मध्ये संचालक मंडळाने शिफारस केलेल्या व सन २०१३-१४ च्या वार्षिक अहवालात दर्शविलेल्या उपविधी दुरुस्ती बाबतचा ठराव **मा. संचालक ॲड. सुरेश पटवर्धन** यांनी सभेपुढे मांडला. त्यास ही सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | सौ. माधुरी मधुकर कुलकर्णी | सभासद क्र. | ४६१९१ |
| अनुमोदक | : | सौ. रंजना शामलाल बाकळे | सभासद क्र. | ४७२५६ |

ठराव सर्वानुमते मंजूर.

मा. अध्यक्षांनी पुढील ठराव मांडण्यासाठी मा. संचालक श्री. हेमल रवाणी यांना सांगितले.

ठराव क्र. ११ : आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी अंतर्गत हिशेब तपासणी, गुंतवणूक लेखापरीक्षण, कर परीक्षण व समवर्ती लेखापरीक्षण करणेकरिता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव **मा. संचालक श्री. हेमल रवाणी** यांनी सभेपुढे मांडला.

आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी अंतर्गत हिशेब तपासणी, कर परीक्षण, गुंतवणूक लेखापरीक्षण, समवर्ती लेखापरीक्षण करणेकरिता तपासनीसांची नेमणूक करण्याचा तसेच त्यांचा मेहेनताना ठरविण्याचा अधिकार ही सर्वसाधारण सभा संचालक मंडळास देत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. केशरसिंग निळकंठ पाटील | सभासद क्र. | ४६९०७ |
| अनुमोदक | : | श्री. संजय भास्कर घांग्रेकर | सभासद क्र. | ६२७६ |

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर मा. अध्यक्षांनी पुढील ठराव मांडण्यासाठी मा. संचालक श्री. मधुसूदन पाटील यांना सांगितले.

मा. संचालक श्री. मधुसूदन पाटील यांनी सांगितले की आपली बँक 'अ' वर्गात येत असल्यामुळे सुधारित सहकार कायद्यानुसार 'अ' वर्गात नामांकन असलेल्या सनदी लेखापाल संस्थाकडून वैधानिक लेखापरीक्षण करुन घेणे अनिवार्य आहे. वैधानिक लेखापरीक्षणासाठी वैध असलेल्या आणि त्यांची नावे सहकार खात्याच्या नामतालिकेत 'अ' वर्गात असलेल्या ७ सनदी लेखापाल परीक्षकांच्या अर्जांचा अभ्यास केला आहे. सदर यादीमध्ये समाविष्ट असलेल्या मे. वैशंपायन ॲण्ड पाध्ये ठाणे या लेखा परीक्षक संस्थेने गेली २ वर्षे आपल्या बँकेचे लेखा परीक्षण केले आहे. त्यांना चांगला अनुभव आहे.

त्यामुळे संचालक मंडळाने सन २०१४ - १५ सालासाठी देखील मे. वैशंपायन ॲण्ड पाध्ये यांची वैधानिक लेखा परीक्षक म्हणून नेमणूक करावी आणि सहकार खात्याने ठरवून दिलेल्या नियमानुसार मेहेनताना द्यावा अशी शिफारस केली आहे, असे सांगून पुढील ठराव सभा पटलावर मंजुरीकरीता मांडला.

ठराव क्र. १२ : सन २०१४-१५ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव **मा. संचालक श्री. मधुसूदन पाटील** यांनी सभेपुढे मांडला.

सन २०१४-१५ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता मे. वैशंपायन ॲण्ड पाध्ये यांची नेमणूक करण्यास ही सभा मंजूरी देत आहे व नियमानुसार त्यांचा मेहेनताना देण्यात यावा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. शेखर सिताराम बर्वे | सभासद क्र. | ९४८५ |
| अनुमोदक | : | श्री. शंकर रामचंद्र शिवळे | सभासद क्र. | २३५० |

ठराव सर्वानुमते मंजूर.

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. शरद वाडेकर यांना सांगितले.

मा. संचालक श्री. शरद वाडेकर यांनी सांगितले की RBI ने ठरविलेल्या निकषाप्रमाणे ०१ ऑक्टोबर २००३ पासून सहकारी बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना बँकेकडून कर्ज घेण्यास बंधन / मनाई असून संचालकांना वा त्यांच्या नातेवाईकांना बँक केवळ त्यांच्या मुदत ठेवी किंवा LIC Policy च्या तारणावर कर्ज देऊ शकते. आपल्या संचालकांनी किंवा त्यांच्या नातेवाईकांनी केवळ मुदत ठेवीच्या तारणावर कर्ज घेतले असल्याची माहिती देण्यात आली.

या विषयी सदर माहिती आपण RBI ला दर ३ महिन्यांनी सादर करीत आलेलो आहोत. तसेच आपल्या वैधानिक लेखा परिक्षकांनी देखील प्रमाणित केले असल्याचे सांगून पुढील ठराव मंजूरी करीता सभेपुढे मांडला.

ठराव क्र. १३ : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबतचा ठराव **मा. संचालक श्री. शरद वाडेकर** यांनी मांडला.

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार आहेत व त्याची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. सदानंद ज्ञानदेव काटकर | सभासद क्र. | ३९८३ |
| अनुमोदक | : | श्री. माधव रावजी भिडे | सभासद क्र. | २८०१८ |

ठराव सर्वानुमते मंजूर.

त्यानंतर पुढील ठराव मा. संचालक प्रा. (डॉ.) वसंत काणे यांनी मांडावा असे मा. अध्यक्षांनी सुचित केले.

ठराव क्र. १४ : मे. ओम बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांना मुख्य कार्यालयाच्या बांधकामात जागा वाढल्याने, वाढीव क्षेत्रफळाची रक्कम देणेबाबतचा विषय **मा. संचालक प्रा. (डॉ.) वसंत काणे** यांनी सभेत मांडला व त्याबाबत माहिती सांगितली.

मे. ओम बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांचेबरोबर झालेल्या जागा खरेदी करारात जागेचे चटई क्षेत्रफळ पहिला, दुसरा व तिसरा मजला मिळून १०,४९७ चौ. फूट नमूद करण्यात आले आहे. त्यावेळी बांधकामास सुरुवात झालेली नव्हती. प्रत्यक्ष बांधकाम झाल्यानंतर जागेचे मोजमाप बिल्डर, डेव्हलपरचे आर्किटेक्ट व बँकेचे आर्किटेक्ट यांनी संयुक्तपणे केले. मोजमाप केल्यानंतर पहिल्या, दुस-या व तिस-या मजल्याचे एकूण चटई क्षेत्रफळ १०,७२९.९१ चौ. फूट आहे. त्यामुळे २३५.९१ चौ. फूट वाढीव जागा आहे. खरेदी

केलेल्या दरानेच आपणास त्यांना रक्कम द्यावयाची आहे. सदर रक्कम ₹ १८,२६,६३८/- होत आहे. २३५.९१ चौ. फूट वाढीव जागा झाल्याने मे. ओम बिल्डर्स, डेव्हलपर्स यांना ₹ १८,२६,६३८/- + VAT + Service Charge चे पेमेंट कायदेशीर बाबी पूर्ण केल्यानंतर देण्यास, ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. रामकृष्ण वासुदेव भिडे सभासद क्र. २४
अनुमोदक : श्री. भगवान राजाराम पाटील सभासद क्र. ४५८१२
ठराव सर्वानुमते मंजूर.

त्यानंतर पुढील ठराव मा. संचालिका सौ. पुष्पा कदम यांनी मांडावा असे मा. अध्यक्षांनी सूचित केले.

ठराव क्र. १५ : बँकेस आवश्यकता वाटल्यास शाखा अथवा कार्यालयाकरिता स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचे अधिकार संचालक मंडळास देणेबाबतचा ठराव **मा. संचालिका सौ. पुष्पा कदम** यांनी सभेपुढे मांडला. त्यानुसार शाखा अथवा कार्यालयाकरिता स्थावर मालमत्ता खरेदी करण्याबाबत महाराष्ट्र शासन व भारतीय रिझर्व बँकेच्या नियमास अनुसरुन निर्णय घेण्याचे अधिकार ही सर्वसाधारण सभा संचालक मंडळास देत आहे.

सूचक : श्री. निलेश मनोहर सारंग सभासद क्र. ४८१९३
अनुमोदक : श्री. शरदचंद्र खंडू गुमास्ते सभासद क्र. २२५४२
ठराव सर्वानुमते मंजूर.

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक डॉ. बळीराम कुमावत यांना सांगितले.

मा. संचालक डॉ. बळीराम कुमावत यांनी सभासदांस प्रशिक्षणाविषयी विस्तृत माहिती दिली. त्या अनुषंगाने सभासदांना प्रशिक्षण देण्याचे बँकेने ठरवले असून त्यासाठी व्याख्याने आणि काही वर्ग आयोजित करण्यात येणार आहेत. त्या संदर्भातील पूर्व सूचना वा माहिती सभासदांना देणार असल्याचे सांगून ठराव सभेपुढे मांडला.

सभासद श्री. भिडे यांनी सूचविले की सभासदांनी गरज वाटेल त्याप्रमाणे गट करुन यावे व प्रशिक्षण कसले पाहिजे हे सांगावे, हे व्यवहार्य होणार नाही. त्यापेक्षा बँकेने कार्यक्रम आयोजित करुन, विषय ठरवून सभासदांना बोलवावे असे सूचविले. यावर मा. अध्यक्षांनी आयोजित करावयाच्या व्याख्यानांची थोडक्यात माहिती देऊन श्री. भिडे यांच्या सूचनेचा संचालक मंडळ विचार करेल असे सांगून ठराव मंजुरीसाठी मांडला.

ठराव क्र. १६ : महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या उपविधीनुसार बँकेच्या सभासदांना सन २०१४-१५ मध्ये द्यावयाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती **मा. संचालक डॉ. बळीराम कुमावत** यांनी सभेत सांगितली, याची सभेत नोंद घेण्यात आली.

सूचक : श्री. प्रभाकर मुरलीधर कोठावदे सभासद क्र. २१९२६
अनुमोदक : श्री. नारायण रामभाऊ वाळुंज सभासद क्र. ४७३४३
ठराव सर्वानुमते मंजूर

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. रमेश गोरे यांना सांगितले.

त्याप्रमाणे मा. संचालक श्री. रमेश गोरे यांनी ठराव सभेसमोर मांडला. त्यांनी व मा. अध्यक्षांनी सदर विषयी विस्तृत माहिती सभेपुढे दिली.

ठराव क्र. १७ : बँकेच्या संचालकांचा पंचवार्षिक कार्यकाल दि. २६.०८.२०१३ रोजी संपला आहे व सहकार खात्याने नेमणूक केलेल्या निवडणुक आयोगाच्या कार्यक्रमानुसार बँकेची निवडणुक घेतली जाईल, याबाबतची माहिती **मा. संचालक श्री. रमेश गोरे** यांनी सभेत सांगितली, सभेने याची नोंद घेतली.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. विद्याधर सखाराम जाधव | सभासद क्र. | ५५५९ |
| अनुमोदक | : | श्री. अरुण हरी महाजन | सभासद क्र. | ३८०१ |
| | | ठराव सर्वानुमते मंजूर | | |

त्यानंतर मा. अध्यक्षांनी बँकेच्या वनीकरण प्रकल्पाची विस्तृत माहिती सभेस दिली व याबाबतचा ठराव मा. संचालक श्री. लक्ष्मीकांत उपाध्याय यांनी सभेपुढे मांडावा असे सुचवले.

ठराव क्र. १८ : वनीकरण

दि. १७ मे २००७ रोजी दि कल्याण जनता सहकारी बँक लि. "संचालक समाजसेवा पुरस्कार निधी" व महाराष्ट्र शासनाचे वनखाते यामध्ये एक त्रिपक्षीय करार करण्यात आला. या करारान्वये टिटवाळ्याजवळील मौजे म्हसकळ या गावी काळू नदीचे तीरावर सर्व्हे क्र. १४२ यावरील १० हेक्टर (२५ एकर) जमीन महाराष्ट्र शासनाने दि कल्याण जनता सहकारी बँकेस ७ वर्षांकरिता विनामूल्य भाडे तत्वावर "सहकारी वनीकरण" या प्रकल्पाकरिता दिली व बँकेने संचालक समाजसेवा पुरस्कार निधी या विश्वस्त निधी (NGO) च्या सहाय्याने "सहकारी वनीकरण" हा प्रकल्प कार्यान्वित करावयाचा असे ठरविले. तसेच सात वर्षाची मुदत पूर्ण केली व सर्वसंमतीने पुनः दोनदा म्हणजे ७ (मूळ मुदत) + ७ + ७ = २१ वर्षांपर्यंत वाढविण्याचे कलमही या करारात आहे. दि. १६ मे २०१४ रोजी ह्या प्रकल्पाची मुदत संपली. त्यापूर्वीच दि. १५.०२.२०१४ रोजी बँक व NGO या दोघांनी या प्रकल्पांतर्गत १२५०० झाडे लावल्याचे व त्यांचे जतन केल्यासंबंधी तपशील सांगणारा अहवाल व त्रिपक्षीय करार पुढे सात वर्षे वाढविण्यास वन खात्याकडे संमती मागितली. परंतु दुर्देवाने वनखात्याने प्रकल्पाची जमीन त्यांच्या ताब्यात घेतली.

आणि अशाच प्रकारच्या प्रकल्पाकरिता शेजारची जागा अथवा दुसरी जागा देता येईल असे सुचविले. त्यामुळे पुढील दोन पर्यायावर विचार करावा व त्याकरिता वार्षिक सर्व साधारणसभेची संमती घ्यावी असे बँक व विश्वस्त निधी (NGO) ने ठरविले.

पर्याय (१) शेजारील जागा किंवा दुसरी जागा सहकारी वनीकरणाकरीता शासनाकडून विनामूल्य भाडे करारावर घ्यावी.

पर्याय (२) या कराराची मुदत वाढविण्याकरिता प्रयत्न करावे.

यापैकी पर्याय (२) संबंधी कलम त्रिपक्षीय करारातच आहे. त्यामुळे हे करणे स्वाभाविकपणेच अभिप्रेत आहे पण आम्ही हा प्रयत्न वार्षिक सर्वसाधारण सभेस सांगून करु इच्छितो. पर्याय (१) करिता वार्षिक सर्वसाधारण सभेची संमती अनिवार्य आहे.

त्यामुळे पर्याय (१) करिता वार्षिक सर्वसाधारण सभेच्या संमतीसाठी मी लक्ष्मीकांत उपाध्याय पुढील ठराव सभेच्या पटलावर ठेवीत आहे.

ठराव करण्यात येतो की, सहकारी वनीकरण प्रकल्पाकरिता महाराष्ट्र शासनाकडून विनामूल्य भाडे कराराने जागा स्वीकारावी व त्याकरिता सहकार खाते व रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार योग्य तो खर्च (गत वर्षीच्या निव्वळ नफ्याच्या जास्तीत जास्त १%) करण्यास ही सभा संमती देत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. विवेक वसंत देहाडराय | सभासद क्र. | २५८३९ |
| अनुमोदक | : | श्री. शंकर रामु मोरे | सभासद क्र. | ११३०९ |
| | | ठराव सर्वानुमते मंजूर | | |

मा. सभासद श्री. भिडे यांनी सदर वनीकरणातील By Product बाबत विचारणा केली तसेच त्याचा विनियम कसा होतो, याची माहिती देण्याची विनंती केली. यावर त्रिपक्षीय करारामध्ये केवळ झाडे लावून त्यांची जोपासना करण्याचे आपले काम असून त्यातून आपण कोणताही लाभ घेऊ शकत नाही, याची माहिती देण्यात आली. मा. अध्यक्षांनी सांगितले की, सदर प्रकल्पामधून कोणताही नफा मिळावा हा उद्देश नसून केवळ सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने पर्यावरण संवर्धनासाठी हा प्रयत्न आहे. तसेच नवीन पिढीला याबाबत माहिती होऊन प्रेरणा मिळावी हा उद्देश असल्याचे सांगितले. तसेच वनीकरण प्रकल्प पुढे सुरु ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकार यांचेकडे सुरु असलेल्या पाठपुराव्याची माहिती दिली.

त्यानंतर सभासद डॉ. तांबडे यांनी सांगितले की, दुसऱ्या जागेचा पर्याय द्यायचा झाला तर नुकत्याच जाहीर झालेल्या Eco Sensitive Zone मधील शिरोशीपासून टोकवडेपर्यंत जवळ जवळ १५० गावांचा विचार करावा. यावर संचालक मंडळ आपल्या सूचनेचा विचार करेल असे मा. अध्यक्षांनी सांगितले.

त्यानंतर मा. अध्यक्ष श्री. आघारकर यांनी मा. श्री. ठाकरे यांचा त्यांनी आपल्या वनीकरणासाठी दिलेल्या योगदानाबद्दल सत्कार केला. यानंतर श्री. ठाकरे यांनी उपस्थित सभासदांना आपल्या वनीकरण प्रकल्पाची थोडक्यात माहिती दिली.

यानंतर पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. सचिन आंबेकर यांना सांगितले.

मा. संचालक श्री. सचिन आंबेकर यांनी सर्व उपस्थित सभासदांना सांगितले की आपल्या बँकेचा Business यावर्षी देखील चांगल्या प्रमाणात वाढला आहे. त्याचप्रमाणे नफाही वाढला आहे. यावर्षी इतर बँकांमध्ये NPA चे प्रमाण वाढले असून आपल्या बँकेस NPA चे प्रमाण कमी करण्यात यश आले आहे. आपली बँक Financially Sound & Well Managed या प्रवर्गात येते. निर्लेखन म्हणजे कर्जमाफी नसून आपला वसुलीचा अधिकार अबाधित ठेवून आणि वसूलीमध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण न करता केवळ तांत्रिकदृष्टया अशी खाती आपल्या Books of Accounts मधून काढून टाकणे आणि ताळेबंद स्वच्छ करणे, अशी ही प्रक्रिया आहे. यात आपली वसुलीची प्रक्रिया कायम चालू राहते असे सांगितले.

आपली बँक ही 'अ' वर्गात येत असून महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा नियम ४९ अन्वये जी कर्जे थकित आहेत त्या कर्जांचे निर्लेखन आपली बँक करु शकते मात्र आपल्या लेखापरीक्षकांनी ती प्रमाणित केली असली पाहिजे आणि वार्षिक सर्वसाधारण सभेने त्यास मान्यता देणे, आवश्यक आहे.

आपले वैधानिक लेखापरीक्षक मे. वैशंपायन ॲण्ड पाध्ये यांनी आपल्याला कर्ज खात्यामधील मुद्दल ₹ ५,३८,३७,६६५.०८ निर्लेखित करण्यास व ₹ ६,१४,५६,६५७.४४ व्याज उलटविण्याचे प्रमाणित केले आहे. ज्यामुळे आपला ताळेबंद स्वच्छ आणि सुदृढ होईल. त्यामुळे आपल्या बँकेचे Gross NPA चे प्रमाण कमी होईल आणि या आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी आपल्याला ₹ १.६० कोटी आयकर कमी भरावा लागेल. NPA हा बँकिंग सेक्टरचा खूप मोठा विषय आहे. निर्लेखित करण्यात आलेल्या कर्जदाराची नावे जाहीर करण्याबाबतच्या प्रश्नास उत्तर देतांना त्यांनी सांगितले की कायद्याच्या तरतुदीनुसार आपण या कर्ज खात्यांची माहिती देऊ शकत नाही. कारण तसे केल्यास बँकेच्या कर्ज वसुली प्रक्रियेत अडथळा निर्माण होऊ शकतो, असे सांगून मा. संचालक श्री. सचिन आंबेकर यांनी ठराव सभेपुढे मांडला.

ठराव क्र. १९ : बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली ज्या खात्यात वसुलीची शक्यता नाही अशी खाती वसुलीचे सर्व हक्क अबाधित राखून निर्लेखित करणे व नफा - तोटा खाती न घेतलेले व्याज उलटविण्यासंबंधात **मा. संचालक श्री. सचिन आंबेकर** यांनी प्रस्ताव मांडला.

सभेपुढे सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेल्या अनुत्पादित कर्जखात्यामधील मुद्दल ₹ ५,३८,३७,६६५.०८ निर्लेखित करण्यास मंजुरी देत आहे व नफातोटा खाती न घेतलेले दि. ३१.०३.२०१४ पर्यंतचे व्याज ₹ ६,१४,५६,६५७.४४ अधिक पुढील व्याज उलटवण्याच्या संचालक मंडळाच्या निर्णयास सदर सभा कायम करीत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. मुकुंद लाला मगर | सभासद क्र. | २०१६० |
| अनुमोदक | : | श्री. प्रकाश शांताराम चावरे | सभासद क्र. | १७५५२ |
| | | ठराव सर्वानुमते मंजूर | | |

सभासद श्री. मुल्हेरकर यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेची वेळ लवकरची ठेवावी जेणेकरुन सभा संपल्यानंतर लांब राहणाऱ्या सभासदांना सोयीचे होईल असे सूचविले.

यावर अध्यक्षांनी संचालक मंडळ आपल्या सूचनेचा विचार जरुर करेल असे सांगितले.

यानंतर मा. उपाध्यक्ष प्रा. विलास पेणकर यांनी सर्व सभासदांचे आभार मानले. काही सभासदांनी उपयुक्त सूचना दिल्या, याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्याचबरोबर सर्व माजी संचालक, श्री. भास्करराव मराठे, श्री. नरेंद्र पवार, सनदी लेखापाल, श्री. केळकर साहेब, श्री. ठाकरे साहेब या सर्वांचे आभार मानले. सभेसाठी हॉल उपलब्ध करुन देणारे महावीर हॉलचे व्यवस्थापक व सभेचे चित्रिकरण करणारे श्री. श्रीनिवास लेले यांचे आभार मानले. बँकेचे एक्झिक्युटिव्ह, अधिकारी व कर्मचारी यांना देखील धन्यवाद दिले.

यानंतर मा. अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**मुख्य कार्यकारी अधिकारी** **अध्यक्ष**